**नि. फौ. खटला क्र.८६/२०१८**

**निशाणी क्र.४१**

**:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०६ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करतो की,**

**माझे नांव** : दिलीप शहाजीराव बोयणे,

**वय** : ६३ वर्षे, **धंदा** : सेवानिवृत्त,

**राहणार** : अनसारवाडा, ता. निलंगा, जि. लातूर.

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::**

मी वर्ष २०१५ ते फेब्रुवारी २०२० पर्यंत पोलीस ठाणे देवणी येथे कार्यरत होतो. दि.१९/०७/२०१८ रोजी मला गुन्हा क्र.८०/२०१८ चा तपास मिळाला होता. त्यासोबत मला खबर आणि एम.एल.सी. मिळाले होते. त्यानंतर मी दि.२०/०७/२०१८ रोजी घटनास्थळी गेलो आणि दोन पंचांसमक्ष पंचनामा केला. आता मला पंचनामा (नि.३५) दाखविला. हा तोच आहे. त्यावर माझी सही आहे व पंचांच्या सह्या आहेत. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. मी घटनास्थळावरून म्हणजे फिर्यादीच्या राहते घरातून काठी जप्त केली. आता मला वस्तूचिन्ह अ वरील काठी दाखविली. ही तीच आहे. मी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. मी आरोपींना नोटीस दिली. मी आरोपींना अटक केली. मला आजरोजी चेहरा आठवत नसल्याने आरोपी विजयप्रकाश व्यतिरिक्त ईतर हजर आहेत हे कळत नाही. मी वैद्यकीय अधिकाऱ्याकडून जखमीच्या दुखापतीचे तीन प्रमाणपत्र प्राप्त केले. आता मला तीन प्रमाणपत्र दाखविले. हे तेच आहेत. त्यावर प्राप्त केल्याबाबत माझ्या सह्या आहेत. (साक्षीदार हा सदर प्रमाणपत्राचा प्रत्यक्ष साक्षीदार नाही. त्यामुळे ते सिध्द झाले नाही. साक्षीदार हा फक्त प्राप्तकर्ता असल्याने सदर तिन्ही प्रमाणपत्रांना फक्त ओळख म्हणून **नि.४२ ते ४४** देण्यात येते.) मी आरोपींविरुध्द पुरावा मिळाल्याने दोषारोपपत्र दाखल केले.

सरतपास पूर्ण.

**:: आरोपीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. एम.एस. नागराळे यांच्यामार्फत ::**

०२. मी फिर्यादीच्या घराचे मालमत्ता पत्रक प्राप्त केले होते. आता मला नमुना–

८ दाखविला. हा तोच आहे. तो फिर्यादीच्या मुलाच्या नावे आहे. (बचाव पक्षाने सदर कागदपत्राबाबत साक्ष गोळा केली. त्यामुळे त्यास **नि.४५** देण्यात येते.) हे म्हणणे खरे नाही की, सदर नमुना ८ हा घटनेच्या पूर्वीचा आहे. मी सदर नमुना ८ हा ग्रामसेवकाकडून प्राप्त केला होता. त्याबाबतचे पत्र दोषारोपपत्रामध्ये दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला फिर्यादीने सदर काठी दिली होती. फिर्यादीचे घर वस्तीमध्ये होते. त्याच्या आजूबाजूला तुरळक घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी आजूबाजूला चौकशी केली नाही आणि फिर्यादीने सांगितल्याप्रमाणे साक्षीदारांचे जबाब नोंदविले. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनामा साक्षीदारांसमक्ष केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मारहाण केली नसल्याबाबत तपासात निष्पन्न झाले. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी तपासामध्ये पुरावा मिळाल्याबाबत खोटे कथन केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत　　　　　　　　सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )　　　　　　　　( श.अ. सुरजुसे )

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.　　　　न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.

दि.१२/०१/२०२६.